महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६६ किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

✻ भूगोलदिन

✻ पानिपतचा शेवटचा घनघोर संग्राम होऊन सदाशिवराव पेशवे यांचा अंत झाला.

✻ ख्रिस्ती बालयेशूच्या महोत्वास प्रारंभ.

१९०५ : अभिनेत्री दुर्गा खोटे यांचा जन्म.

१९९८ : एस.एस.सुब्बालक्ष्मी यांची भारतरत्न पुरस्कारासाठी निवड झाली.

सेन्सेक्स ८३,६२७.६९ -२५०.४८(०.३०%)

डॉलर ₹ ९०.२६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | १५ |
| दिल्ली | १८ | ०५ |
| मुंबई | ३२ | २० |
| नागपूर | २९ | १४ |
| पुणे | ३० | १३ |

आज मकर संक्रांती



**सुविचार**

प्रत्येक पहाट आपल्याला नव्या स्वप्नांसाठी जागं करते.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-७:०७ संध्या-६:०६

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,४३,९६०/- २,७५,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### कल्याणमध्ये महायुतीच्या रॅलीत भीषण स्फोट

**कल्याण ।** योगिधाम परिसरात महायुतीच्या प्रचार रॅलीत एका कार्यकर्त्याने हातात धरलेला झेंडा लोंबकळणाऱ्या विद्युत तारेस लागलयामुळे जोरदार स्फोट झाला आणि विजेचा धक्का बसल्याने क्षितिज पाटील गंभीर जखमी झाला.

# राज्यातील १२ जिल्हा परिषद १२५ पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर

## ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या जिल्हा परिषदांच्याच निवडणुका





वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच राज्य निवडणूक आयोगाने आज मोठी घोषणा केली आहे. या पत्रकार परिषदेत राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर केली आहे. आता १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडणार, तर ७ फेब्रुवारी रोजी या जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.**

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने फक्त १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांचीच निवडणूक का जाहीर केली? उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक कधी होणार? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. पण याबाबत देखील राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी मोठी माहिती दिली आहे.

### ➤ 'मतदाराला दोन मतं देणं बंधनकारक'

'जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत प्रत्येक मतदाराला दोन मत देणे बंधनकारक आहे. त्यातील एक मत जिल्हा परिषदेसाठी आणि एक मत पंचायत समिती गणासाठी द्यावं लागेल. तसेच या निवडणुकीसाठी नामनिर्देश प्रतिक्रिया ही ऑफलाईन पद्धतीने राबविली जाणार आहे', अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

### ➤ या जिल्हा परिषदांची निवडणूक झाली जाहीर

**कोकण विभाग :** रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

**पुणे विभाग :** पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर

**मराठवाडा विभाग :** छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर

### ➤ निवडणूक कार्यक्रम असा आहे

**नोटिफिकेशन :** १६ जानेवारी रोजी निघणार

**उमेदवारी अर्ज :** १६ ते २१ जानेवारी

**अर्जाची छाननी :** २२ जानेवारी २०२६

**अर्ज माघारी :** २७ जानेवारी दुपारी ३ वाजेपर्यंत

**अंतिम यादी व चिन्ह वाटप :** २७ जानेवारी दुपारी ३.३० नंतर

**मतदान :** ५ फेब्रुवारी रोजी पार पडणार

**मतमोजणी :** ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता.

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर झाली. मात्र, उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक कधी होणार? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी म्हटलं की, 'आम्ही आज १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर केली. पण आता उर्वरित ज्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या आहेत, त्यांच्या निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयाने अद्याप काही निर्देश दिलेले नाहीत. जेव्हा सर्वोच्च न्यायालय निर्देश देईल, त्यानुसार उर्वरित ज्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या आहेत, त्यांची निवडणूक घेतली जाईल', अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी यावेळी सांगितली.

# शिक्षक पात्रता परीक्षेच्या निकालाचा मार्ग अखेर मोकळा!

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत नोव्हेंबरमध्ये राज्यभरात घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेची अंतिम उत्तर सूची अखेर जाहीर करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील हजारो शिक्षक उमेदवारांच्या निकालाबाबतची प्रतीक्षा आता संपण्याच्या मार्गावर असून, निकाल लवकरच जाहीर होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.**



महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा राज्यातील प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शिक्षक भरतीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या परीक्षेसाठी यंदा राज्यभरातून मोठ्या संख्येने उमेदवारांनी अर्ज केले होते. परीक्षेनंतर परिषदेकडून १९ डिसेंबर २०२५ रोजी अंतरिम उत्तर सूची प्रसिद्ध करण्यात आली होती. या उत्तर सूचीतील पेपर क्रमांक एक आणि दोनमधील प्रश्न, उत्तर पर्याय अथवा त्यांच्या अचूकतेबाबत उमेदवारांकडून आक्षेप मागविण्यात आले होते. परीक्षा परिषदेने उमेदवारांना २७ डिसेंबर २०२५पर्यंत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करण्याची संधी दिली होती. या कालावधीत मोठ्याप्रमाणावर उमेदवारांकडून विविध प्रश्नांबाबत हरकती प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांचा सखोल आणि पारदर्शकपणे विचार करण्यात आला.

संबंधित विषयातील तज्ज्ञांची समिती नेमून प्रत्येक आक्षेपाची स्वतंत्र तपासणी करण्यात आली. तज्ज्ञांच्या अभिप्रायानुसार आवश्यक त्या दुरुस्त्या करून अंतिम उत्तर सूची तयार करण्यात आली आहे. ही अंतिम उत्तरसूची आता अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली असून, यानंतर कोणतेही आक्षेप, हरकती किंवा निवेदने स्वीकारली जाणार नसल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे. अंतिम उत्तर सूचीनुसारच महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ चा निकाल तयार केला जाणार असून, सध्या निकालाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची

(पान २ वर)

# जळगाव महापालिकेत १४ जागांवर महायुतीला फटका?

## मंत्री गिरीश महाजनांची कबुली

प्रतिनिधी । जळगाव



**महापालिकेच्या ७५ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत महायुतीच्या १२ उमेदवारांची आधीच बिनविरोध निवड निश्चित झाली असून, उर्वरित ६३ जागांसाठी आता भाजपसह शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) कंबर कसली आहे. दरम्यान, स्वपक्षातीलच काही बंडखोरांनी आव्हान दिल्यानंतर बदललेली राजकीय परिस्थिती लक्षात घेता महायुतीला काही ठिकाणी मोठा फटका बसू शकतो, अशी कबुली भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे.**

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत विशेषतः सत्ताधारी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांना प्रतिस्पर्धी पक्षांपेक्षा आपल्याच पक्षातील नाराज आणि बंडखोर उमेदवारांचा अधिक धसका घ्यावा लागत आहे. बंडखोरांमुळे अनेक प्रभागांतील निवडणुकीची गणिते पूर्णपणे बदलली असून, सत्ताधारी पक्षांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

महापालिकेच्या एकूण ७५ जागांपैकी तब्बल २२ जागांवर अपक्ष उमेदवारांनी थेट लढत निर्माण केली आहे. विशेष म्हणजे या अपक्ष उमेदवारांमध्ये सत्ताधारी तसेच प्रमुख राजकीय पक्षांतील बंडखोरांचा मोठ्याप्रमाणावर समावेश आहे. उपलब्ध माहितीनुसार भाजप आणि शिवसेना मिळून १४ बंडखोर उमेदवारांनी आपापल्या पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. त्यामुळे या दोन्ही पक्षांची चिंता वाढली आहे. अनेक ठिकाणी मत विभाजनाची भीती अधिकृत उमेदवारांना सतावत आहे.

पक्षाकडून तिकीट न मिळाल्याची नाराजी, स्थानिक पातळीवरील गटबाजी तसेच प्रभागनिहाय

(पान २ वर)





# भारतात वर्ल्डकप न खेळण्याचा बांगलादेशचा हट्ट!

वृत्तसंस्था । मुंबई

टी-२० विश्वचषक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. येत्या ७ फेब्रुवारीपासून टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेला सुरूवात होत आहे. तर ८ मार्च रोजी स्पर्धेतील अंतिम सामना होईल. आयसीसीने या स्पर्धेसाठी वेळापत्रक जाहीर केलं आहे. पण भारत आणि बांगलादेश यांच्यातील तणावात्मक संबंधांममुळे बांगलादेशने भारतात टी-२० विश्वचषक खेळण्यास नकार दिला आहे. आयसीसीबरोबर झालेल्या बैठकीबाबतचे अपडेट समोर आले आहेत.

बांगलादेश क्रिकेट बोर्ड टी-२० विश्वचषक स्पर्धेचे सामने भारतात न खेळण्यावर ठाम आहे. आयसीसीबरोबर झालेल्या ताज्या बैठकीत

(पान २ वर)

# दंडाचा निर्णय अव्यवहार्य आणि शिक्षणव्यवस्थेला मारक

## मुंबई विद्यापीठ विरोधात प्राध्यापक संघटना आक्रमक




वृत्तसंस्था । मुंबई

**मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील काही विद्यार्थ्यांची विद्यापीठाच्या ऑनलाईन लॉगिन प्रणालीत वेळेवर नोंदणी झाली नाही. याप्रकरणी विद्यापीठाने महाविद्यालयांना २ ते १० लाख रुपये आणि विद्यार्थ्यांना ५ हजार रुपये इतका दंड लादण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाविरोधात प्राध्यापक संघटनेने तीव्र हरकत नोंदवली आहे. हा निर्णय अत्यंत अन्यायकारक, अव्यवहार्य, विद्यार्थीविरोधी व संपूर्ण शिक्षणव्यवस्थेला मारक असून तो तात्काळ रद्द करण्याची मागणी संघटनेने केली आहे.**

**महाविद्यालयांवर २ ते १० लाख रुपये इतका दंड लादल्यास त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होईल. अनेक महाविद्यालये आर्थिक अडचणींना सामोरे जात असून, या दंडाचा फटका शैक्षणिक सुविधा, शिक्षक भरती, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थी सेवांवर होण्याची शक्यता आहे. परिणामी, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये अनावश्यक तणाव वाढत असल्याचे 'मस्ट'चे म्हणणे आहे.**

विद्यापीठ प्रशासनाने अलीकडे लागू केलेल्या या दंडात्मक धोरणामुळे संलग्न महाविद्यालयांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासन यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स संघटनेच्या (मस्ट) मते, नोंदणी प्रक्रियेत होणारा विलंब हा बहुतांश वेळा महाविद्यालये किंवा विद्यार्थी यांच्या निष्काळजीपणामुळे

(पान २ वर)

# वृद्ध माता-पित्यांकडे दुर्लक्ष केल्यास कर्मचाऱ्यांच्या पगारात १० टक्के कपात

## तेलंगणा सरकारचा मोठा निर्णय



वृत्तसंस्था । हैदराबाद

**आपल्या वृद्ध आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर आता तेलंगणा सरकार कठोर कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत आहे. अशा कर्मचाऱ्यांच्या पगारातून १० टक्के रक्कम कापून ती थेट त्यांच्या पीडित पालकांच्या बँक खात्यात जमा करण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी जाहीर केला आहे. या निर्णयामुळे कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे पाठ फिरवणाऱ्या कर्मचाऱ्यांना आता मोठा आर्थिक फटका सोसावा लागणार आहे.**

मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी सोमवारी स्पष्ट केले की, वृद्ध पालकांनी आपल्या मुलांविरुद्ध केलेल्या तक्रारींची प्रशासन गांभीर्याने दखल घेईल.

पालकांच्या उदरनिर्वाहासाठी मुलाच्या पगारातून कपात केलेली ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केली जाईल, याची खात्री सरकार करेल. याशिवाय, वरिष्ठ नागरिकांच्या सुविधेसाठी राज्य सरकार 'प्रणाम' नावाने डे-केअर सेंटर्सची साखळी उभी करणार असून, या विशेष योजनेसाठी ५० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने पाऊले उचलताना मुख्यमंत्र्यांनी दिव्यांगांसाठीही अनेक मोठ्या घोषणा केल्या.

मानवीय दृष्टिकोनातून समाजातील शेवटच्या घटकाला सक्षम करणे हेच सरकारच्या ध्येय असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी दिव्यांग आणि वृद्धांना या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. तेलंगणा सरकारच्या या धाडसी पावलामुळे सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या एका नवीन प्रशासकीय संस्कृतीची सुरुवात होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# १० मिनिटांत डिलिव्हरीची सक्ती बंद

## डिलिव्हरी बॉईजच्या सुरक्षेसाठी केंद्राचा निर्णय




वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**क्विक कॉमर्स कंपन्यांच्या १० मिनिटांत डिलिव्हरी देण्याच्या अवास्तव स्पर्धेमुळे डिलिव्हरी बॉईजच्या जिवावर बेतणाऱ्या संकटाची दखल अखेर केंद्र सरकारने घेतली आहे.**

केंद्र सरकारने झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट आणि झेप्टो यांसारख्या मोठ्या प्लॅटफॉर्म्सना १० मिनिटांची अनिवार्य वेळमर्यादा हटवण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे लाखो गिग वर्कर्सना मोठा दिलासा

(पान २ वर)

## संपादकीय

### अस्मितेचा पक्ष

राजकीय वादाकडे निव्वळ भावनिक दृष्टीने पाहणेच चूकच. याचे साधे कारण असे की भावनांचे मूल्यमापन करता येत नाही. समजा तसे केलेच आणि एखाद्याची भावना कमकुवत वा कमअस्सल असल्याचा निष्कर्ष निघालाच, तरीही त्या निष्कर्षामुळे उलट ती भावना प्रबळ होण्याचा संभव अधिक. तेव्हा वाद काय स्वरूपाचा किंवा कशाबद्दल आहे, वाद कोण घालते आहे यापेक्षाही त्यातल्या दोन्ही बाजूंच्या भूमिका काय आहेत आणि आताच तो उफाळण्याचे कारण काय याकडे आपापल्या भावना दूर ठेवून पाहणे बरे. केरळ आणि कर्नाटक या दोघा दक्षिणी राज्यांदरम्यान भाषेवरून सध्या पेटत असलेल्या वादाबाबत तर मराठी जनांनी थोडे अंतर राखून पाहिल्याखेरीज योग्य भूमिका घेताच येणार नाही. केरळने त्या राज्यात मल्याळम भाषा हीच इयत्ता दहावीपर्यंत पहिली भाषा असेल, असे विधेयक आणले. कर्नाटकने त्यास विरोध केला. याचे कारण कासारगोड हा सीमावर्ती जिल्हा. तो केरळचा भाग. पण तिथले बहुसंख्य रहिवासी कन्नड भाषक. त्यांच्यावर ही सक्ती नको, असे कर्नाटकचे म्हणणे. हा वाद त्यांच्यातला. पण यावरून मराठी जनांना बेळगावची आठवण होणारच. मराठीप्रेमाच्या भावनांना हात घातला जाणारच. निव्वळ भावनिकदृष्ट्या पाहिले तर, ज्यांनी बेळगावच्या मराठी बांधवांवर कन्नडसक्ती केली, त्यांनाच आज दुसऱ्या राज्याच्या भाषासक्तीविरुद्ध गळे काढावे लागताहेत यासारखा विचित्र आनंदही होणारच. तो होऊ नये, यातच आपले हित. ते कसे? यासाठी दोन्ही बाजूंच्या भूमिकांकडे नीट पाहावे लागेल. केरळची भूमिका प्रस्तावित मल्याळम भाषा विधेयक-२०२५ मध्ये नमूदच आहे. तेथील विधानसभेच्या येत्या २० जानेवारीपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनात हे विधेयक मांडले जाईल. त्यातील कलम ६ मध्ये केरळच्या सर्वच्या सर्व जिल्ह्यांत इयत्ता दहावीपर्यंत मल्याळमसक्तीचा मुद्दा आहे. लगोलग कलम ७ मध्ये भाषिक अल्पसंख्याकांच्या संस्थांना ही सक्ती लागू नसल्याचाही उल्लेख आहे. पण असल्या कागदोपत्री सवलती दिल्या तरी सक्ती ती सक्तीच, हे कर्नाटकाला चांगलेच माहीत आहे. बेळगावातल्या मराठी शाळा तरी कर्नाटक सरकारने सरसकट बंद कुठे केल्या? पण मराठी शाळांमध्ये पुरेसे शिक्षक नाहीत, विद्यार्थिसंख्या कमी म्हणून त्या कन्नड शाळांमध्ये विलीन करण्याचा सपाटा मात्र बेळगावात पुरेपूर दिसला. हा कदाचित भातखाऊ आणि चपातीखाऊ राज्यांमधला फरक. चपाती तुकडे करून खावी लागते. तिचे तुकडे तसेच राहतात. म्हणून तर पाकिस्तानातही पंजाबी लोकगीतांपासून पंजाबी पॉपपर्यंतचे संगीत बहरते.

# मनपा निवडणुकीसाठी उद्या ५१६ केंद्रावर मतदान

## ● आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांची पत्रकार परिषदेत माहिती; शुक्रवारी दुपारी निकाल होणार स्पष्ट

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, उद्यापासून निवडणूक साहित्याचे वाटप केले जाणार आहे. गुरुवारी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून शुक्रवारी १६ जानेवारी रोजी दुपारी २ वाजेपर्यंत निकालाचे चित्र स्पष्ट होईल, अशी माहिती महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



यावेळी उपायुक्त निर्मला गायकवाड-पेखळे, शोभा बाविस्कर उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने मोठा फौजफाटा तैनात केला आहे. महानगरपालिका प्रशासनाने मतमोजणीसाठी ६ विभागांमध्ये विभागणी केली असून एकूण १४ टेबलवर ही प्रक्रिया पार पडणार आहे. पहिल्या विभागात प्रभाग क्रमांक १, २ आणि ३ ची मतमोजणी होणार असून प्रत्येकी ६ राऊंड होतील. दुसऱ्या विभागात प्रभाग क्रमांक ४ चे ६ राऊंड, तर प्रभाग ५ आणि ६ चे प्रत्येकी ७ राऊंड होतील. तिसऱ्या विभागात प्रभाग ७ चे ६ राऊंड, तर प्रभाग ११ आणि १२ चे प्रत्येकी ७ राऊंड नियोजित आहेत. चौथ्या विभागाच्या नियोजनानुसार प्रभाग १३ चे ७ राऊंड होतील, तर प्रभाग १४, १८ आणि १९ चे प्रत्येकी ५ राऊंड पार पडणार आहेत. पाचव्या विभागात प्रभाग १५, १६ आणि १७ या तिन्ही प्रभागांचे प्रत्येकी ६ राऊंड होतील. सहाव्या विभागात प्रभाग ८ चे ८ राऊंड, प्रभाग ९ चे ९ राऊंड आणि प्रभाग १० चे एकूण ७ राऊंड होणार आहेत. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी निकाल जाहीर करतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### ■ दुपारी २ वाजेपर्यंत निकाल हाती येण्याची शक्यता...

शुक्रवार, दि.१६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. यासाठी एकूण १४ टेबल लावण्यात आले आहेत. सर्वात आधी टपाली मतपत्रिकांची मोजणी होईल, त्यानंतर ईव्हीएम मशीनमधील मोजणी सुरू होईल. दुपारी २ वाजेपर्यंत सर्व निकाल हाती येण्याची शक्यता आहे. विजयी उमेदवारांना जागीच प्रमाणपत्र दिले जाईल. जे उमेदवार गैरहजर असतील, त्यांना महापालिकेतून प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

### ■ ५१६ केंद्रांवर ३,५५५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती...

मतदानासाठी ५१६ केंद्र असून यात १ पिंक बूथ (महिला संचलित), २ दिव्यांग केंद्र आणि १२ आदर्श मतदान केंद्रांचा समावेश आहे. त्यासाठी ३,५५५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून यात २०० महिला कर्मचारी आणि ५२ क्षेत्रीय अधिकारी, ५१६ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. उद्या एमआयडीसीतील वखार महामंडळाच्या गोडावून क्रमांक १४ व १७ येथून निवडणूक साहित्याचे वाटप होईल.

### सकाळी ७ वाजता मतदानाला होईल सुरुवात

गुरुवार, दि.१५ सकाळी ६ वाजता 'मॉक पोल' होईल. त्यानंतर सकाळी ७ वाजता प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होईल तर सायंकाळी ५.३० वाजता मतदान बंद होईल. मात्र, साहित्याच्या वेळी जे मतदार रांगेत असतील, त्यांनाच मतदानाचा हक्क बजावता येईल. त्यानंतर मतदानानंतर सर्व यंत्रे सीलबंद करून वखार महामंडळातील स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात येतील, अशी माहितीही आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी यावेळी पत्रकारांशी बोलतांना दिली.

## ट्रॅक्टरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी । धरणगाव

**ट्रॅक्टर आणि दुचाकीचा भीषण अपघातात दुचाकी चालक तरुणाचा ट्रॅक्टरच्या चाकाखाली चिरडून जागीच मृत्यू झाला, तर मागे बसलेला १ जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील अहिरे शिवारात घडली.**

एकनाथ दयाराम मराठे (वय-२२, रा.बाभुळगाव, ता. धरणगाव) आणि त्याचा मित्र अमोल संजय सोनवणे (वय-१९) हे दोघे सोमवारी (दि. १२) दुपारी २:३० वाजेच्या सुमारास दुचाकीने (क्र. एम.एच.०५, डीडी २०७२) ने बाभुळगावहून बांभोरी प्र.चा. येथील एका कंपनीत कामावर जात होते. अहिरे गावाजवळून जात असताना त्यांच्या पुढे एक निळ्या रंगाचा ट्रॅक्टर (क्र. एम.एच.४०, आय.१८२५) भरधाव वेगाने जात होता. एकनाथ मराठे याने ट्रॅक्टरला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला असता, ट्रॅक्टर चालकाने अचानक आपले वाहन उजव्या बाजूला वळवले. यामुळे दुचाकी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीच्या मागील भागाला धडकली.

## आव्हानांपासून पळ न काढता त्यांना सामोरे जा!

### ● प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल यांचे प्रतिपादन; राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । जळगाव

**विद्यार्थ्यांनी स्ट्राँग माईंडसेट ठेवावा. आव्हानांपासून पळ न काढता त्यांना सामोरे जाणे, अपयशातून शिकणे आणि सातत्याने स्वतःची प्रगती करणे हीच खरी युवकांची ओळख आहे, असे प्रतिपादन जी.एच. रायसोनी महाविद्यालयाच्या संचालिका प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल यांनी केले.**



जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन त्या बोलत होत्या.

पुढे बोलतांना प्रा.डॉ.अग्रवाल यांनी, स्वामी विवेकानंद यांनी युवकांना केवळ आत्मविश्वास दिला नाही, तर राष्ट्रनिर्मितीची दिशा दिली. आजचा युवक हा केवळ उद्याचा नागरिक नाही, तर देशाचा कणा आहे. फक्त भारत स्वतंत्र झाला, एवढ्यावर समाधान मानण्याची वेळ आता संपली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या या शंभर वर्षांत भारताने तंत्रज्ञान, विज्ञान, अर्थव्यवस्था आणि सामाजिक क्षेत्रात मोठी क्रांती केली आहे, असे अभिमानाने म्हणता येईल इतपत युवकांनी काम केले पाहिजे. शंभर वर्षांनंतर आपण असे म्हणू शकलो पाहिजे की, भारत केवळ स्वतंत्र नाही, तर सशक्त, आत्मनिर्भर, विकसित आणि आर्थिक महासत्ता बनलेला देश आहे, असे सांगून आज भारत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे. डिजिटल क्रांती, स्टार्टअप्स आणि इनोव्हेशनच्या माध्यमातून युवकांनी भारताला जागतिकस्तरावर सक्षम बनवावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी 'विकसित भारत २०४७ व्हॉईस ऑफ युथ' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यात साक्षी सुनील कासार (बी.टेक. ई.अँड. टी.सी.- द्वितीय वर्ष) ने प्रथम क्रमांक, सुमित दीपक खैरे (बी.टेक. मेकॅनिकल - प्रथम वर्ष) ने द्वितीय क्रमांक तर मोहित अशोक बडगुजर (बी.टेक. इलेक्ट्रिकल-द्वितीय वर्ष) ने तृतीय क्रमांक पटकावला.

## पान १ वरून

**शिक्षक पात्रता परीक्षेच्या......**

माहिती देण्यात आली आहे. या परीक्षेचा निकाल लवकरच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना पुढील शिक्षक भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. शिक्षक पात्रता परीक्षेचा निकाल हा अनेक उमेदवारांच्या भविष्यातील अध्यापन कारकिर्दीचा पाया ठरणार असल्याने, अंतिम उत्तर सूची जाहीर झाल्यामुळे उमेदवारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आता निकाल कधी जाहीर होतो, याकडे राज्यभरातील शिक्षक उमेदवारांचे लक्ष लागले असून, या निकालानंतर राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेला गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**दंडाचा निर्णय अव्यवहार्य......**

नसून, विद्यापीठाच्या प्रणालीतील तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे होतो. विद्यापीठाच्या लॉगिन प्रणालीत वारंवार तांत्रिक त्रुटी येणे, सर्व्हर डाउन होणे, पोर्टल वेळेत उपलब्ध न होणे, तसेच विद्यापीठाकडून वेळेवर किंवा स्पष्ट सूचना न मिळणे, सूचना वारंवार बदलणे आदी कारणांमुळे नोंदणी प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. अशा परिस्थितीत महाविद्यालये व विद्यार्थ्यांना दोषी धरून इतक्या मोठ्या प्रमाणात दंड आकारणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांविरुद्ध असल्याचे 'मस्ट'चे अध्यक्ष प्रा. डॉ. विजय पवार यांनी सांगितले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ५ हजार रुपये इतका दंड हा शिक्षणापासून दूर ढकलणारा ठरू शकतो. अनेक विद्यार्थ्यांचे दंडाच्या भीतीने शिक्षण खंडित होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही, संघटनेने नमूद केले आहे.या पार्श्वभूमीवर 'मस्ट'ने विद्यापीठ लॉगिन नोंदणी संदर्भात महाविद्यालयांवर लादण्यात येणारा २ ते १० लाख रुपये इतका दंड आणि विद्यार्थ्यांवर लादण्यात येणारा ५ हजार रुपयांचा दंड तात्काळ रद्द करावा, अशी मागणी केली आहे. तसेच तांत्रिक अडचणी व विद्यापीठस्तरावरील कारणांमुळे झालेल्या विलंबासाठी महाविद्यालये व विद्यार्थ्यांना जबाबदार धरू नये, विद्यापीठ प्रशासनाने या विषयावर सकारात्मक आणि तातडीचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही संघटनेने व्यक्त केली आहे.

**जळगाव महापालिकेत......**

राजकीय समीकरणांमुळे अनेक इच्छुकांनी पक्ष शिस्त झुगारून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून आले आहे. काही प्रभागांमध्ये बंडखोर उमेदवारांची स्थानिक पातळीवर चांगली पकड असल्याने ते अधिकृत उमेदवारांना कडवी टक्कर देत आहेत. परिणामी, सत्ताधारी महायुतीच्या मतांमध्ये फूट पडण्याची शक्यता आहे. त्याचा थेट फायदा विरोधी पक्षांना होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर बंडखोरी रोखणे हे भाजपचे नेते गिरीश महाजन आणि शिवसेनेचे नेते गुलाबराव पाटील यांच्यासमोर मोठे आव्हान ठरले आहे. बंडखोरांना माघार घ्यायला लावण्यासाठी आणि नाराजांची मनधरणी करण्यासाठी अखेरपर्यंत जोरदार प्रयत्न सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मात्र, अनेक बंडखोर आपल्या भूमिकेवर ठाम असल्याने हे प्रयत्न कितपत यशस्वी ठरतील? याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पक्षादेश झुगारून बंडखोरी करणाऱ्यांवर महायुतीकडून कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. विशेषतः भाजपकडून तब्बल ३० पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यातून बंडखोरीला थारा दिला जाणार नाही, असा संदेश पक्ष नेतृत्वाने दिला आहे. तरीही स्थानिक पातळीवरील राजकारण आणि वैयक्तिक प्रभावामुळे बंडखोर उमेदवारांचा प्रभाव कायम असल्याचे दिसून येत आहे. एकंदरीत, यंदाच्या महापालिका निवडणुकीत बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांची भूमिका निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत. मत विभाजन, बदलती समीकरणे आणि अंतर्गत नाराजी यामुळे निवडणुकीचा निकाल अधिकच चुरशीचा होण्याची शक्यता असून, सत्ताधारी महायुतीसाठी ही निवडणूक खऱ्या अर्थाने अग्नी परीक्षा ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर, जळगाव महापालिकेत सुरूवातीपासूनच १०० टक्के जागा जिंकण्याची भाषा करणारे भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनीही आता काही ठिकाणी महायुतीला फटका बसेल, अशी कबुली दिली आहे. काही जागांवर नुकसान झाले तरी महायुती ७० पेक्षा अधिक जागांवर विजयी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**१० मिनिटांत डिलिव्हरीची......**

मिळाला आहे. 'ब्लिंकिट'ने आपल्या ब्रँडिंगमधून '१० मिनिटांत डिलिव्हरी'चे आश्वासन आधीच काढून टाकले आहे. डिलिव्हरी पार्टनर्सवरील दबाव कमी होणार केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविय यांनी या कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत अनेक फेऱ्यांमध्ये चर्चा केली. या बैठकीत डिलिव्हरीसाठी दिल्या जाणाऱ्या अत्यंत कमी वेळामुळे चालकांवर मानसिक आणि शारीरिक दबाव येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. हा दबाव कमी करण्यासाठी आणि रस्ते सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सरकारने कंपन्यांना ही कडक डेडलाइन शिथिल करण्यास राजी केले आहे. संसदेत उमटले होते पडसाद - गिग वर्कर्सच्या सुरक्षेचा मुद्दा नुकत्याच झालेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनातही गाजला होता. आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी हा मुद्दा उचलून धरला होता. १० मिनिटांच्या डिलिव्हरीचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी डिलिव्हरी एजंट्सना रस्त्यावर जीवघेणी कसरत करावी लागते, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले होते. केवळ ग्राहकांच्या सोयीसाठी मानवी जीवाशी खेळणे थांबवावे, असे आवाहन त्यांनी संसदेत केले होते.

**भारतात वर्ल्डकप न......**

बांगलादेशने पुन्हा एकदा भारतात खेळण्यास नकार दिला आहे. बोर्डाने म्हटलं आहे की ते कोणत्याही परिस्थितीत त्यांचे विश्वचषकाचे सामने भारतात खेळणार नाहीत.

सुरक्षेच्या कारणास्तव बीसीबीने भारतात खेळण्यास नकार दिला आहे. त्यांनी पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला त्यांचे सामने दुसऱ्या ठिकाणी खेळवण्याची विनंती केली आहे. पण आयसीसीचं म्हणणं आहे की स्पर्धेचं संपूर्ण वेळापत्रक फायनल झालं आहे, म्हणून बीसीबीने आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करावा. मात्र, यावरही आपल्याच भूमिकेवर ठाम राहिला. संभाव्य पर्यायांचा शोध घेण्यासाठी चर्चा सुरू ठेवण्यावर दोन्ही पक्षांमध्ये सहमती झाली आहे.

## बालविश्व इंग्लिश मीडियम स्कूलला 'महाराष्ट्राचे शिल्पकार' पुरस्कार

प्रतिनिधी । जळगाव

**मूल्याधिष्ठित शिक्षण, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि प्रेरणादायी नेतृत्व या त्रिसूत्रीवर आधारित शैक्षणिक कार्यासाठी बालविश्व इंग्लिश मीडियम स्कूलला पुणे येथे पार पडलेल्या समारंभात 'महाराष्ट्राचे शिल्पकार पुरस्कार' प्रदान करण्यात आला.**



राज्यभरातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना दिला जाणारा हा मानाचा पुरस्कार असून, शिक्षण क्षेत्रात बालविश्व शाळेने केलेल्या सातत्यपूर्ण, नाविन्यपूर्ण व विद्यार्थी केंद्री कार्याची ही राज्यस्तरीय पावती मानली जात आहे.

पुणे आयोजित कार्यक्रमात संस्थापिका भारती चौधरी यांच्यावतीने डायरेक्टर सौरभ चौधरी हास्य जत्रा हेम समीर चौघुले यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. शाळेने केवळ अभ्यासक्रमापुरते शिक्षण न देता विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित करण्यावर विशेष भर दिला आहे.

आधुनिक शिक्षण पद्धतींसोबतच भारतीय संस्कृती व मूल्यांचे संवर्धन ही शाळेची वेगळी ओळख ठरली आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून शाळेचे प्रेरणादायी नेतृत्व, शिक्षकवृंदाची निष्ठा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची दखल घेण्यात आली आहे.

## हिंदू राष्ट्र जागृती सभेचे १ फेब्रुवारी रोजी आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**हिंदु जनजागृती समिती आणि हिंदुत्ववादी संघटनांच्यावतीने रविवार, दि.१ फेब्रुवारी रोजी मानराज पार्क परिसरातील पिंप्राळा श्रीराम मंदिराच्या मैदानावर हिंदु राष्ट्र जागृती सभेचे आयोजन करण्यात आले आहे.**

या हिंदु राष्ट्र सभेच्या प्रसारासाठी पिंप्राळा परिसरातील श्रीराम मंदिर आणि जळगाव नगरीचे ग्रामदैवत श्रीराम मंदिरात, सनातन संस्थेचे धर्म प्रचारक सदगुरु नंदकुमार जाधव, माजी नगरसेवक मनोज चौधरी यांच्याहस्ते श्रीफळ वाढवून

### सभेच्या यशस्वितेसाठी ग्रामदैवत श्रीरामाला साकडे




प्रसाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समनव्यक प्रशांत जुवेकर, गजानन तांबट यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. यावेळी गादीपती मंगेश महाराज, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे आकाश फडे, योग वेदांत समितीचे अनिल चौधरी, भाजप सोशल मीडियाचे मयूर भदाणे, अधिवक्ता निरंजन चौधरी उपस्थित होते.

# काका, वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत लोकेश पाटील झाले डॉक्टर

## ● तालुक्यातील पहिले डी.एम.कॉर्डिओलॉजीस्ट होण्याचा मिळाला बहुमान

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील सुप्रसिद्ध नृसिंह हॉस्पिटलचे संचालक सुप्रसिद्ध हार्ट स्पेशालिस्ट डॉ.दिलीप ओंकार पाटील यांचे सुपुत्र तर डॉ.दीपक ओंकार पाटील उर्फ साई यांचे पुतणे डॉ.लोकेश दिलीप पाटील यांनी इंदोर येथून डी.एम. कॉर्डिओलॉजी परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन वैद्यकीय क्षेत्रात नाव लौकिक केला असून ते तालुक्यातील पहीले डी.एम. कॉर्डिओलॉजीस्ट डॉक्टर झाले आहेत. त्यांनी अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, पेस मेकर व टू डी इको विषयाचा सखोल ज्ञान अवगत केले आहे. त्यांचा तालुक्यातील रुग्णांना मोठा फायदा होणार आहे.**



### ➲ तालुक्यातील रुग्णांना होणार फायदा...

डॉ.लोकेश पाटील यांनी एमबीबीएसचे शिक्षण डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेजमधून पूर्ण केले आहे. पुढील शिक्षण एनकेपी साळवे मेडिकल कॉलेज, नागपूर मधून तर डी.एम. कॉर्डिओलॉजीचे शिक्षण इंदोर येथील बी अरविंदो कॉलेज इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स कॉलेज येथून घेतले आहे. त्यांनी अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, पेस मेकर व टू डी इको विषयाचा सखोल ज्ञान अवगत केले असून त्याचा तालुक्यातील रुग्णांना फार मोठ्ठा फायदा होणार आहे.

डी.एम.कॉर्डिओलॉजीचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यात डॉ.लोकेश पाटील यांनी डीएम कॉर्डिओलॉजीच्या अभ्यासक्रमात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण करून बहुमान मिळवला आहे. डॉ.लोकेश हे नूतन दिलीप पाटील यांचे ते सुपुत्र असून बिडगाव येथील प्रगतिशील शेतकरी विठ्ठल ओंकार पाटील, सेवानिवृत्त प्राध्यापक विनायक पाटील, अरविंद पाटील, स्व.विश्वजीत पाटील यांचे पुतणे आहेत. तर डॉ.पराग पाटील, डॉ.राहुल पवार, डॉ.गौरांगी पाटील यांचे ते बंधू आहेत. त्यांच्या उत्तुंग यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेत दि.१२ रोजी आदिवासी विकास कार्यक्रमावर आधारीत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यावरण व भूशास्त्र संचालक प्रा.एस.एन. पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून व्य.प. सदस्या प्रा.पवित्रा पाटील, कुलसचिव डॉ.विनोद पाटील आणि प्रा.किशोर पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. योगेश महाजन यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली, यावेळी डॉ.विनोद पाटील यांनी , आदिवासी समुदायासाठी विद्यापीठाने नंदुरबारसारख्या दुर्गम आणि आदिवासी बहुल क्षेत्रात शिक्षणाची गंगा पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे सांगितले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✽ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✽ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### खेळ, आरोग्य व शिक्षणावर मार्गदर्शन

**शिरपूर ।** शहरातील आर.सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात खेळ, आरोग्य व शिक्षण विषयावर संस्थेच्या सचिव रेषा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्राचार्य पी. आर. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान घेण्यात आले. प्रमुख व्याख्याते नागपूर येथील डॉ. पंकज मुंडे यांनी मानवी जीवनात खेळाचे महत्व, शिक्षण आणि खेळ यांचा सहसंबंध, खेळात माणूस करिअर कसं घडवू शकतो, याबाबत मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक व्ही. बी. चौधरी यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवून दिले.

### जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**धुळे ।** राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत, नायब तहसीलदार मायानंद भामरे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# मतदान करण्यासाठी विद्यार्थ्यांचा पालकांकडे 'पत्राद्वारे' बालहट्ट

## जागरूकता निर्माण होऊन निवडणुकीत मतदानांची टक्केवारी वाढेल असा विश्वास

प्रतिनिधी । धुळे

**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महानगरपालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांच्या प्रगल्भ कल्पक दृष्टिकोनातून आणि स्विप कार्यक्रमांतर्गत घर घर संपर्क अभियानातून महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांना आपल्या विद्यार्थ्यांनमार्फत आई बाबांना पत्र विद्यार्थीमार्फत घरा घरापर्यंत घरातील प्रत्येकापर्यंत पोहचवत आहेत.**





पालकांसाठी पत्रलेखन करण्याचे व सदर पत्र आपल्या पालकांना वाचून दाखविण्याचे आवाहन केलेले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त व महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांनी शाळांना सूचना दिलेल्या होत्या. महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळेतील सर्व शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेचे महत्त्व पटवून दिले व आपल्या पालकांना न चुकता मतदानाचे कर्तव्य बजवण्याबाबत पत्र लिहून घेतले. ते पत्र विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना वाचून दाखवले व बाबतचा फोटो आपल्या मित्रमंडळी व नातेवाईकांना पाठविला यामुळे निश्चितच मतदानाविषयक जागरूकता निर्माण होऊन या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढेल असा विश्वास अति. आयुक्त तथा स्विप नोडल अधिकारी करुणा डहाळे. प्रशासन अधिकारी विश्वंभर दासरवाड यांनी व्यक्त केला. सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी धुळे शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सूक्ष्म नियोजन करून आपले कर्तव्य बजावले त्याबाबत आयुक्त साहेबांनी समाधान व्यक्त केले.

### शहिदी समागम शताब्दी वर्ष सोहळा

प्रतिनिधी । धुळे

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त १५ ते २३ जानेवारी, दरम्यान जिल्ह्यात विविध कार्यकमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख यांनी दिली आहे. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावर आधारित चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्याख्यान, प्रभात फेरीचे आयोजन सर्व शाळा व महाविद्यालयामध्ये होणार आहे. तसेच विजेत्यांना पारितोषिक, प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येणार आहे.

# पीक पाहणी करण्याची २४ जानेवारीपर्यंत मुदत

प्रतिनिधी । शहादा

**शासनाच्या रब्बी हंगाम ई-पीक पाहणीला सुरुवात झाली असून, सातबारा उताऱ्यावर पीक पेरा स्वतः शेतकऱ्यांनी करायचा आहे. पीक पाहणी करण्याची अंतिम तारीख २४ जानेवारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रभारी तहसीलदार शैलेंद्र गवते यांनी केले आहे.**

शहादा तालुक्यात रब्बी हंगाम २०२५ साठी ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत अद्यापपर्यंत १ हजार ९६ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी डीसीएस व्हर्जन ४.०.५ या मोबाइल ॲपद्वारे आपल्या सातबारावर पिकाची नोंदणी केली आहे. सद्यः स्थितीत तालुक्यात डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई-पीक पाहणीची नोंदणी अत्यल्प झाली आहे. उर्वरित सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी ॲपद्वारे करण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले आहे. नोंदणीसाठीचे ॲप गुगल क्रोम अपडेट करून मोबाइलमध्ये इन्स्टॉल करून घ्यावे. तसेच ई-पीक पाहणी प्रत्यक्ष शेत बांधावर जाऊन अपलोड करावी. या कामी संबंधित शेतकऱ्यांजवळ मोबाइल नसल्यास अथवा हाताळता येत नसल्यास संबंधित गावाचे ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक तसेच संबंधित गावात नियुक्त केलेले सहाय्यक यांची मदत घेऊन आपल्या पिकांची नोंदणी करून घ्यावी. या ॲपविषयी काही अडचण असल्यास संबंधित गावाचे ग्राम महसूल अधिकारी तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर व आपल्या गावातील डीसीएसकरिता नियुक्त सहायक यांची मदत घ्यावी, असे कळविण्यात आले आहे.

# कनोसा कॉन्व्हेंट हायस्कूल येथे भूकंपावर आधारित मॉक ड्रिलमधून जनजागृती

प्रतिनिधी । धुळे

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, धुळे तसेच राष्ट्रीय आपदा प्रतिसाद दल (एनडीआरएफ), पुणे यांच्या वतीने शहरातील कनोसा कॉन्व्हेंट हायस्कूल येथे भूकंपावर आधारित मॉक ड्रिल यशस्वीरीत्या पार पडला. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेला हा सराव सहाय्यक कमांडंट कुर्वे सारंग यांच्या पर्यवेक्षणाखाली तसेच निरीक्षक राहुलकुमार रघुवंश यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.**




या मॉक ड्रिलचा मुख्य उद्देश भूकंपासारख्या आपत्तीच्या वेळी विविध विभागांमधील समन्वय, तात्काळ प्रतिसाद आणि बचाव राहत कार्यांची तयारी अधिक सक्षम करणे हा होता. या मॉक ड्रिलमध्ये सुमारे ६० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, १,७०० विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच एनडीआरएफचे ३४ कर्मचारी असे एकूण १८५९ सहभागी झाले होते. या सरावामुळे आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व विभागांची तत्परता व समन्वय क्षमता वाढली असून विद्यार्थ्यांमध्ये आपत्तीविषयक जनजागृतीत लक्षणीय वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमात जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, अग्निशमन सेवा, आरोग्य विभाग, एसडीआरएफ, होमगाडतसेच विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# धुळ्यात आग्रा रोडवरील रामवाडी भागात पिकअपच्या सहाय्याने एटीएम उखडले

प्रतिनिधी । धुळे

**शहरासह परिसरात चोरट्यांनी धूडगुस घातला असून आग्रा रोडवरील रामवाडी भागात एचडीएफसी बँकेचे एटीएम उखडण्याचा थरारक प्रकार उघडकीस आला.**



पिकअप वाहनाच्या सहाय्याने एटीएम दोरी बांधून उखडण्यात आले. मात्र काही अंतरावर असलेल्या गतिरोधकामुळे एटीएम रस्त्यावर पडले. त्याचदरम्यान पोलिसांची व्हॅन दाखल झाल्याने चोरटे एटीएम सोडून पसार झाले. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून एटीएम सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

आग्रा रोडवरील रामवाडी भागात एचडीएफसी बँकेचे एटीएम आहे. आज पहाटे अडीच वाजेच्या सुमारास एक पिकअप व्हॅन एटीएमजवळ आली. त्यामधून तीन ते चार चोरटे उतरून त्यांनी प्रथम एटीएमच्या काचा फोडून आत प्रवेश केला. त्यानंतर एटीएमला मजबूत दोरी बांधून पिकअप वाहनाच्या सहाय्याने ते उखडण्यात आले. उखडलेले एटीएम वाहनात टाकून नेत असताना हीबाब काही सतर्क नागरिकांच्या दिसून आली. त्यांनी वाहनाचा पाठलाग सुरू केला. त्यादरम्यान यल्लमा देवी मंदिराजवळील गतिरोधकावर एटीएम उधळून रस्त्यावर पडले. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. त्याच दरम्यान मोहाडी पोलिसांची गस्तीवरील व्हॅन घटनास्थळी दाखल झाली. पोलिस वाहन दिसताच चोरटे एटीएम घटनास्थळीच सोडून पसार झाले.

# कासारेत बिबट्याने केली गोठ्यातील गाईची शिकार

प्रतिनिधी । साक्री

**कासारे येथील शेतकरी सुभाष कृष्णा देसले यांच्या शेतात बिबट्याने गोठ्यात शिरून गाईवर हल्ला करत तिला ठार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे कासारे परिसर आणि शेतकरी वर्गामध्ये मोठी भीती पसरली असून वन्य वाढत्या प्राण्यांच्या संचारामुळे शेतात जाणेही कठीण झाले आहे.**

कासारे येथील शेतकरी सुभाष देसले यांचे गाव शिवारात शेत असून तिथेच त्यांचा पशुधनाचा गोठा आहे. दि ९ रोजी पहाटे बिबट्याने गोठ्यात प्रवेश केला आणि बांधलेल्या गाईवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात गाय जागीच ठार झाली. सकाळी जेव्हा देसले शेतात गेले, तेव्हा त्यांना हा प्रकार लक्षात आला. त्यांनी तात्काळ पिंपळनेर वनविभागाशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि मृत गाईचा रितसर पंचनामा केला आहे. या परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा संचार वाढला असून अनेकांना बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शनही झाले आहे. त्यामुळे वनविभागाने या भागात पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. ९ रोजी पहाटे घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील शेतकरी धास्तावले आहेत. सध्या शेतीची कामे हंगामानुसार जोरात सुरू आहे.

# शेलबारी घाटात ७१ लाखांचा विदेशी मद्य, बिअरचा साठा जप्त

प्रतिनिधी । पिंपळनेर

**राज्य उत्पादन शुल्क विभागाने साक्री तालुक्यातील शेलबारी घाट परिसरात मोठी कारवाई केली. विदेशी मद्य आणि बिअरची वाहतूक रोखली. तीन वाहनांसह ७१ लाख ७३ हजार ८६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र तिघ वाहन चालक पसार झाले.**



नाशिक जिल्ह्यातून पिंपळनेरच्या दिशेने अवैधरीत्या मद्य वाहतूक होत असल्याची शेलबारी खात्रीशीर माहिती दुय्यम निरीक्षक एस. एफ. ठेंगडे यांना मिळाली होती. त्यानुसार काल दि.११ रोजी पथकाने शेत घाटात सापळा रचला. तेव्हा नाशिककडून पिंपळनेरच्या दिशेने येणाऱ्या तीन वाहनांना पथकाने थांबण्याचा इशारा केला असता, चालकांनी रस्त्याच्या कडेला वाहने उभी करून अंधाराचा फायदा घेत पळ काढला. वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये रॉयल स्टॅग, रॉयल स्पेशल, ब्लेंडर्स प्राईड, मॅजिक मोमेंट आदी विविध बँडचे विदेशी मद्य व बियर असा एकुण १४ लाख ७३ हजार ८६४ रुपये किंमतीचा साठा आढळून आला. तसेच एमएच १४-एचजी-९९९२, जीजे-२६-ए-२८६९ आणि एमएच-४६-सीएच-०९२९ अशी ५७लाखांची वाहने असा एकूण ७१ लाख ७३ हजार ८६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# एकाला लोखंडी पाईपने मारहाण

प्रतिनिधी । अक्कलकुवा

**भांडणाची कुरापत काढून लोखंडी पाईपने मारहाण करीत एकाला जखमी केल्याची घटना घाटपाडा येथे घडली. याप्रकरणी मोलगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



अक्कलकुवा तालुक्यातील पाटपाडा काठी येथील सुरेश सेनापती नाईक यांना मारहाण झाली आहे. मागील भांडणाची कुरापत काढून संतोष गोविंद पाडवी याने लोखंडी पाईपने मारहाण करीत सुरेश नाईक यांना जखमी केले आहे. तसेच शिवीळ करून जिवेठार मारण्याची धमकी दिली आहे.

याबाबत सुरेश सेनापती नाईक यांनी मोलगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संतोष गोविंद पाडवी याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हे. कॉ. पितांबर जगदाळे करत आहेत.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ११ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चाळीसगाव रोड पोलिस ठाणे हद्दीतील ११ सराईत गुन्हेगारावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.**

या आरोपीविरुद्ध यापूर्वी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून त्याची आक्रमक व समाजविघातक पार्श्वभूमी लक्षात घेता ही कारवाई करण्यात आली आहे.

हाशिम मलक अब्दुल रहमान (वय ३० रा. मिल्लत नगर, धुळे), जावेद उर्फ नकट्या मोहम्मद शेख (रा. सुल्तानिया मदरसा जवळ, जामचा मळा, धुळे), आहद आबीद हुसेन अन्सारी, अरबाज शेख साजीद मन्यार, जाहिद उर्फ नाट्या हुसेन सुलतान अन्सारी (रा. हाजी नगर, धुळे), रेहान खान फरदीन खान पठाण उर्फ पोपण्या (रा. अंबिका नगर, धुळे), वसीम उर्फ वड्या सलीम रंगरेज (रा. शब्दीर नगर, शंभर फुटी रोड, धुळे), सोहेल आरीफ शहा (रा. जनता सोसायटी, धुळे), शाकीर शहा रजमान शहा उर्फ भुर्या (रा. कबीरगंज, धुळे), बिलाल सुबराती शाह (रा. ऐंशी फुटी रोड, धुळे), फिरोज चिवडा उर्फ नासीर खान पठाण (रा. पुर्व हुडको, चाळीसगाव रोड, धुळे) यांच्या विरोधात ही कारवाई करण्यात आली. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) व (३) अन्वये दि. १२ जानेवारी रोजी रात्री एक वाजेपासून दि. १६ जानेवारी रोजी रात्री बारा वाजेपर्यंत आरोपींना धुळे तालुका हद्दीत प्रवेशास प्रतिबंध घालण्यात आली आहे. या कालावधीत आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. आले आहे.

### आर्थिक साक्षरता कार्यक्रम

प्रतिनिधी । शिरपूर

शहरातील क्रांतीनगर येथील आर. सी. पटेल प्राथमिक शाळेत एचडीएफसी सिक्युरिटीज, एम्पॉहर फाउंडेशन मुंबई व जिल्हा परिषद, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता कार्यक्रम घेण्यात आला. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापक सी. डी. पाटील, शिक्षिका मीनल माळी, भूषण पाटील, सुधाकर जाधव, मंदाकिनी देशमुख, कामिनी देवरे आदी उपस्थित होते. सुधाकर जाधव यांनी आर्थिक साक्षरता महत्व, बचत, उत्पन्न खर्च नियोजन, बँकिंग व्यवहार, इच्छा, गरज यावर विद्यार्थ्यांशी चर्चा करून मार्गदर्शन केले.

# तळोद्याच्या उपनगराध्यक्षपदी शीतल पाडवी एक मताने विजयी

## स्वीकृत सदस्यपदी राष्ट्रवादीतर्फे गिरधर सागर तर शिवसेनेचे हितेंद्र क्षत्रिय यांची बिनविरोध निवड

प्रतिनिधी । तळोदा

**तळोदा नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी व स्वीकृत सदस्य निवडी साठी पीठासीन अधिकारी तथा लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांची अध्यक्षतेखाली विशेष सभा पार पडली.**





● गिरधर सागर
स्वीकृत सदस्य



● हितेंद्र क्षत्रिय
स्वीकृत सदस्य
(शिवसेना)

उपनगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीतर्फे शितल लक्ष्मण पाडवी (पटेल) तर शिवसेनेचे कपिल सुनील कर्णकार व मोनिका सुरज माळी यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. कपिल कर्णकार यांनी माघार घेतली दोन अर्ज शिल्लख राहिले, हात उंचावून मतदान झाले. राष्ट्रवादीतर्फे शीतल लक्ष्मण पाडवी (पटेल) यांना ११ मते तर भाजपा शिवसेनाच्या मोनिका सुरज माळी यांना १० मते मिळाली उपनगराध्यक्ष पदी शीतल लक्ष्मण पाडवी ह्या एक मताने विजयी झाल्याचे पिठासीन अधिकारी तथा लोकनियुक्त नगराध्यक्ष भाग्यश्री योगेश चौधरी यांनी घोषित केले. नंतर स्वीकृत सदस्य साठी राष्ट्रवादीतर्फे गिरधर रामचंद्र सागर तर शिवसेना भाजपात गटातर्फे हितेंद्र सरवसिंग क्षत्रिय यांचे बिनविरोध निवड करण्यात आले.

सदस्य पदासाठी राष्ट्रवादीतर्फे गिरधर रामचंद्र सागर शिवसेनातर्फे हितेंद्र सरवसिंग क्षत्रिय यांची बिनविरोध निवड झाल्याचे पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी यांनी घोषित केले. समर्थकांनी फटाक्याची अतिश बाजी केली. राष्ट्रवादी व भाजपा शिवसेना गटाचे नगरसेवक उपस्थित होते. निवडणूक कामी मुख्याधिकारी विक्रम जगदाळे यांनी काम पाहिले.

### अस्तित्वतर्फे २५ रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

प्रतिनिधी । शिरपूर

अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनतर्फे मोतीबिंदू मुक्त शिरपूर उपक्रम अंतर्गत २५ रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेसाठी नाशिक येथे पाठविण्यात आले. अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशन संचालिका द्वेता करण नथवाणी यांच्या संकल्पनेतून तसेच माजीमंत्री आ. अमरिशभाई पटेल, आ. काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भुपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली फाउंडेशनतर्फे विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यानुसार जनक विला येथे नुकतेच मोफत मोतीबिंदू तपासणी शिबीर घेण्यात आले.

# महिलांच्या संरक्षणासाठी निवारण समिती गठीत करा अन्यथा १ लाखापर्यंत दंड

प्रतिनिधी । धुळे

कामाच्या ठिकाणी महिलांवरील अत्याचार व शोषणाची तक्रार ऐकून न्याय १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असतील अशा सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी कार्यालय, संस्था, आस्थापना, शाळा महाविद्यालय, रुग्णालय, कंपनी अंतर्गत तक्रार निवारण समिती समिती गठीत करावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी मधुरा सूर्यवशी यांनी केले आहे.

कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी महिलांच्या शासनाने लैंगिक छळ प्रतिबंध कायदा २०१३ अंतर्गत कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहे.

ज्या कार्यालयामध्ये ही समिती गठीत केलेली नाही किंवा समितीची माहिती दर्शविणारा फलक कार्यालयात स्पष्टपणे लावलेला नसेल, अशा आस्थापनांवर १ लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येणार आहे.

# भाजपवर पाईप चोरांचा प्रचार करण्याची वाईट वेळ

## आ.एकनाथराव खडसे यांची जाहीर सभेतून टीका

प्रतिनिधी । जळगाव

**पाईप चोरीप्रकरणी ज्यांच्याविरोधात विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली होती, त्यांच्याच समर्थनार्थ आज महापालिका निवडणुकीत प्रचार करण्याची वाईट वेळ भाजपवर आल्याची घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे ज्येष्ठ नेते आ.एकनाथराव खडसे यांनी केली.**




प्रभाग क्रमांक १४ मधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे अधिकृत उमेदवार अशोक लाडवंजारी, तडवी नाजमीन मकबुल, सना शेख रियाज व जमिलोद्दीन शेख शारिफुद्दीन शेख यांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.१२ रोजी तांबापुरातील हजरत बिलाल चौकात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, महानगराध्यक्ष एजाज मलिक, शिवसेना (ठाकरे) चे संपर्कप्रमुख संजय सावंत, अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मजहर पठाण, माजी जि.प.अध्यक्ष दिलीप खोडपे, डॉ.अभिषेक ठाकुर, खाटीक समाजाचे महाराष्ट्र झोनल अध्यक्ष रईस खाटीक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ.खडसे यांनी, तुमची कीव करावीशी वाटते. ज्यांच्यावर पाईप चोरीचा आरोप केला, ज्यांच्याविरोधात पुरावे देत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. रस्त्यावर उतरून आंदोलन केले, आज त्याच उमेदवारांचा प्रचार करण्याची वेळ भाजपच्या पदाधिकाऱ्यांवर आली आहे, असे सांगून **'वाह रे बिजेपी तेरा खेल, सब पाईप चोरो का हो रहा मेल,'** अशी टीका त्यांनी केली. भाजपाला उमेदवार उधार घ्यावे लागले. शिवसेनेकडून त्यांनी उमेदवार उधार घेतले, असे सांगून त्यांनी भाजपने आयारामांना दिलेल्या महत्त्वावरही नेम धरला.



आजवर भाजपविरोधात असलेले, ज्यांच्याविरोधात भाजपने आंदोलने केली, आरोप केले, तेच माजी नगरसेवक आज भाजपमध्ये दाखल झाले असून त्यांनाच उमेदवारी दिली गेली आहे.

या उलट भाजपसाठी निष्ठेने काम करणारे जुने कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक उदय भालेराव यांच्यासह अनेक जाणते कार्यकर्ते बाजूला पडल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. यावेळी शिवसेना (ठाकरे) चे संपर्कप्रमुख संजय सावंत यांनीही महायुतीवर जोरदार टीका केली.

### ➤ अनाथ मुलांना दत्तक घेणार : लाडवंजारी

**यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे उमेदवार अशोक लाडवंजारी यांनीही मनोगत व्यक्त करत आपला वचननामा जाहीर केला. शहीद अब्दुल हमीद चौक बनवणार, प्रभागात वाचनालय आणि व्यायाम शाळा सुरू करणार, युवकांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणार, प्रभागातील अनाथ मुलांना दत्तक घेणार, आवास योजनेंतर्गत घर बांधकामासाठी निधी मिळवून देणार, असे आश्वासन त्यांनी यावेळी मतदारांना दिले.**

# रासेयो स्वयंसेवकांच्या श्रमदानातून विष्णापूर येथे वनराई बंधारा



प्रतिनिधी । चोपडा

समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर विष्णापूर या दत्तक गावामध्ये दि. १० ते १६ जानेवारीदरम्यान आयोजित करण्यात आले होते. विष्णापूर गावाजवळच्या जंगलामध्ये पाणी अडवण्यासाठी वनराई बंधारा विद्यार्थ्यांच्या मदतीने बांधण्यात आला. हे गाव महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दत्तक घेण्यात आले आहे.

केशव स्मृती प्रतिष्ठान, जळगावचे आदित्य साळवे यांनी विद्यार्थ्यांना वनराई बंधारा बांधणीचे प्रशिक्षण दिले. तसेच वनराई बंधारा प्रत्यक्ष बांधण्यामध्ये ही विद्यार्थ्यांसोबत सहकार्य केले. शिबिराच्या नियोजनासाठी व प्रत्यक्ष कृती कार्यक्रमासाठी समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य प्रा. डॉ. आशिष गुजराथी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सरपंच जगदीश भिल, ग्रामपंचायत सदस्य संदीप पाटील, वन विभागातील प्रशांत साबळे, (आर एफ ओ. वनविभाग, अडावद), यांच्या सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. वनराई बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांची सोय झाली आहे.

**➤ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या सूचनेनुसार, रासेयो स्वयंसेवकांनी शिबिर कालावधीमध्ये गावाच्या विकासासाठी श्रमदान करून योगदान देणे महत्त्वाचे असते. त्यादृष्टीने या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये पाणी अडवून ते जमिनीत जिरविण्यासाठी गावालगतच्या जंगलामध्ये वनराई बंधारा श्रमदानातून बांधला. प्रा. डॉ. संबोधी देशपांडे, (कार्यक्रम अधिकारी), प्रा. डॉ. उत्तम सोनकांबळे, (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.**

## थोडक्यात

### रोटरीतर्फे महिलांसाठी ब्युटी कोर्स मोफत

**भुसावळ ।** येथील रोटरी क्लबतर्फे समाजातील सर्व स्तरातील महिलांसाठी एकूण सहा दिवसांचे ब्युटी पार्लर कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. याचा उद्देश समाजातील सर्व महिला आर्थिक सक्षम झाल्या पाहिजे व आपल्या स्वतः च्या पायावर उभ्या राहिल्या पाहिजे. प्रकल्प प्रमूख म्हणून चारुशीला महाजन यांनी काम पाहिले व संपूर्ण आठवडाभर महिलाना मार्गदर्शन केले.

# चोपडा येथील शांताबाई चोरडिया यांच्या देहदानाने वैद्यकीय शिक्षणाला मिळेल नवी दिशा

प्रतिनिधी । चोपडा

**वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या देहदान या सामाजिक उपक्रमातून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होत आहे. शहरातील ज्येष्ठ नागरिक शांताबाई चोरड़िया यांनी संथाराव्रताची पूर्णाहुती करून मृत्यूनंतर देहदानाचा संकल्प पूर्ण करत समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.**



स्व. केशरमलजी नेमिचंदजी चोरड़िया यांच्या धर्मपत्नी तथा संजय, दिलीप व श्यामसुंदर यांच्या आत्या असलेल्या श्रीमती शांताबाई चोरड़िया यांनी रविवार,दि.११ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता पावन संथाराव्रताची पूर्णाहुती केली. त्यांच्या यानिर्णयामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात मोलाची भर पडली आहे.

त्यांच्या देहदानामुळे वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मानवी शरीररचनेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळणार आहे. शस्त्रक्रिया, संशोधन तसेच उपचार पद्धती अधिक प्रभावीपणे आत्मसात करता येणार आहेत. तज्ज्ञांच्या मते, शरीरदानामुळे वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता वाढून भविष्यातील डॉक्टर अधिक सक्षम घडतील.

# भडगाव शेतकी संघाच्या चेअरमनपदी राजेंद्र परदेशी तर व्हा. चेअरमनपदी हिरामण पाटोळे

प्रतिनिधी । भडगाव

**भडगाव शेतकी सहकारी संघाच्या चेअरमन व व्हा. चेअरमनसाठी दि.९ रोजी सकाळी ११ वाजता निवडीचा कार्यक्रम व संचालक मंडळाची सभा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा अध्याशी अधिकारी महेश कासार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.**



शेतकी सहकारी संघाच्या नवनिर्वाचीत चेअरमनपदी राजेंद्र लालचंद परदेशी यांची तर व्हा. चेअरमनपदी हिरामण सुखदेव पाटोळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. प्रत्येकी दोघांचे एकमेव अर्ज आल्याने ही निवड जाहीर करण्यात आली. चेअरमनपदाचा भैय्यासाहेब पाटील यांनी तर व्हा. चेअरमन पदाचा देविदास माळी या दोघांनी ठरल्याप्रमाणे राजीनामे दिले होते. या दोघ रिक्त जागांसाठी हा निवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. नवनिर्वाचीत चेअरमन राजेंद्र परदेशी व व्हा. चेअरमन या दोघांचा सत्कार आ.किशोर पाटील यांचेसह संचालक मंडळ व उपस्थित नागरिकांमार्फत करण्यात आला. यावेळी अशोक परदेशी यांनीही दोघांचा सत्कार केला. यावेळी प्रतापराव पाटील, जयवंत पाटील, खुमानसिंग पाटील, प्रभाकर पाटील, अमोल पाटील, जयवंत पाटील, गुलाब पाटील, रायचंद परदेशी, हिरामण पाटोळे, शुभांगी पाटील, योजना पाटील, आदी उपस्थित होते. आभार भैय्यासाहेब पाटील यांनी मानले.

## निधन वार्ता

### विमलबाई जाधव



**रोटवद, ता.धरणगाव ।** येथील रहिवासी विमलबाई जगन्नाथ जाधव (वय ७६ ) यांचे सोमवार, दि. १२ रोजी दुपारी २ वाजता निधन झाले. त्या विवेक जाधव यांच्या आई होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, आणि नातवंडे असा परिवार आहे.

# संत रविदास महाराज जयंतीनिमित्त चर्मकार महासंघाची बैठक उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती १ फ्रेबुवारी रोजी असल्याने यानिमित्त चोपडा येथील विश्रामगृहात राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.**




**चोपडा – चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे याचा सत्कार करताना अध्यक्ष सोपान मोरे, रोहिदास विसावे, लक्ष्मण काविरे, जितेंद्र विसावे, उत्तम चव्हाण, परेश चित्ते संतोष विसावे, सुर्यप्रकाश बाविस्कर आदी छायाचित्रात दिसत आहेत.**

यावेळी धरणगाव येथील भानुदास विसावे यांच्या पत्नी तिसऱ्यादा नगरसेवकपदी प्रचंड मतांनी निवडून आल्या. याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त केंद्र प्रमुख उत्तम चव्हाण, मंगल खजुरे, सोपान मोरे, रोहिदास मोरे यांनी विविध विषयावर उहापोह केला .

यावेळी युवा जिल्हाध्यक्ष विनोद खजुरे, जिल्हा संघटक प्रमुख, जितेंद्र विसावे, तालुका अध्यक्ष सोपान मोरे, सोशल मिडिया प्रमुख निलेश वाघ, जिल्हा सदस्य उत्तम चव्हाण, परेश चित्ते, दिनकर शिरसाठ, रोहिदास मोरे, संतोष विसावे, सूर्यप्रकाश बाविस्कर, विकी विसावे, रोहिदास विसावे, सागर काविरे, दिनेश खजुरे, लक्ष्मण काविरे मंगल चव्हाण, राहुल काविरे, निलेश काविरे, प्रभू अहिरे, रोहित करणकार्ड, विजय पाथरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन उत्तम चव्हाण यांनी तर आभार सूर्यप्रकाश बाविस्कर यांनी मानले.

यशस्वीतेसाठी सर्व चर्मकार समाज बांधवानी सहकार्य केले.

# डॉ.पाटील महाविद्यालयात दोन दिवसीय कार्यशाळा




प्रतिनिधी । चोपडा

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव पीएम –उषा, नवी दिल्ली अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातर्फे 'Capacity Building of Teachers' या विषयावर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशीच्या सत्राच्या सुरुवातीला व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य प्राध्यापक डॉ.आर. एम. बागुल व वक्ते डॉ. किरण पाटील आदी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात जळगाव येथील एस.एस.बी.टी. तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रा. डॉ. किरण पाटील यांनी ' FUTURE OF ARTIFICIAL INTELLIGENCE IN TEACHING, RESEARCH AND EDUCATION PART -I' या विषयावर सोप्या व प्रभावी भाषेत अकॅडेमीक कॅलेंडर, टिचिंग प्लॅन, निकालांचे विश्लेषण, रिसर्च आऊटलाईन, प्लॅगॅरिझम, डेटाबेस तसेच संशोधनात कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करण्यासाठी कोणकोणते ॲप्स वापरावेत, यावर विस्तृत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात जळगाव येथील एस. एस. बी. टी. तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रा. डॉ. पंकज झोपे यांनी 'BENEFIT OF ARTIFICIAL INTELLIGENCE IN RESEARCH AND EDUCATION PART - II' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी Translate, Visualization Tools, Dimension. AI, Elicit, consensus, Data. Gov, Prompt Engineering, Research buddy, AI writer, Journal finder अशा संशोधनासाठी उपयुक्त साधनांचा वापर कसा करावा याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेच्या विविध सत्रांचे सूत्रसंचालन डॉ.पी. एन. सौदागर यांनी केले तर आभार डॉ.जे. जी. पाटील यांनी मानले.

# रंगोत्सवात रंगले जिल्हा परिषद विटनेर शाळेचे विद्यार्थी

## राष्ट्रीय स्पर्धेत शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी पटकावले गोल्ड मेडल

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील विटनेर जि.प. शाळेने राष्ट्रीय स्तरावर रंगोत्सव आर्ट कॉम्पिटिशन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी सहभाग घेत २१ पारितोषीक पटकावित जोरदार कामगिरी केली. यात विद्यार्थ्यांनी ५ गोल्ड, ५ सिल्वर, ब्राँझ व एक विशेष बक्षिसाचा समावेश आहे. शाळेतील उपक्रमशील शिक्षक हेमंत पाटील यांनीही ट्रॉफी, सन्मान पत्र प्राप्त केले. याबद्दल विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा गौरव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, घोडगाव केंद्राचे केंद्र प्रमुख प्रमोद बाविस्कर यांच्या हस्ते करण्यात आला.**



कार्यक्रमाचे प्रारंभी गटविकास अधिकारी यांच्या हस्ते शाळेचे विविध फलकांचे अनावरण करण्यात आले. यामध्ये शाळेची माहिती देणारा दर्शनी फलक, ओलंपिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा क्रीडांगण फलक, मुक्ताई परसबाग फलक, शहीद भगतसिंग वनोद्यान फलक, भविष्यवेधी शिक्षण दर्शवणारा फलक आदी फलकांचे अनावरण करण्यात आले. तद्नंतर राष्ट्रीय आर्ट स्पर्धेत गोल्ड, सिल्वर, ब्राँझ असे पदक विजेते विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट, मेडल, भेटवस्तू, गुलाब पुष्प देऊन तसेच मान्यवरांचा करण्यात आला. या स्पर्धेमध्ये रंगकाम स्पर्धा, हस्तलेखन स्पर्धा, स्केचिंग स्पर्धा, कार्टून मेकिंग स्पर्धा, कोलाज कॉम्पिटिशन,फिंगर अँड थम पेंटिंग, ग्रीटिंग कार्ड स्पर्धा, टॅटू मेकिंग स्पर्धा, मास्क मेकिंग स्पर्धा आदी स्पर्धांच्या समावेश होता शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्व स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत जवळपास २१ मेडल व ट्रॉफी मिळाल्या याबद्दल विद्यार्थी व शिक्षकाचा गटविकास अधिकाऱ्यांनी गौरव केला. तसेच यापुढेही शाळेला सर्व प्रकारची प्रशासकीय मदत करण्याची ग्वाही गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, केंद्राचे केंद्रप्रमुख प्रमोद बाविस्कर तसेच गावातील सरपंच कविता पाटील ग्रामस्थ व माजी विद्यार्थी संघाने दिली. याप्रसंगी सरपंच कविता पाटील, उपसरपंच निलेश कोळी, शालेय स्थापन समिती अध्यक्ष लक्ष्मण कोळी, दिलीप पाटील, भावलाल कोळी, मंगल पाटील, योगेश कोळी, प्रवीण कोळी, सोपान सैंदाने, गौरव कोळी, देविदास रायसिंग, अशोक कोळी, संभाजी कोळी, अजय कोळी, गोपाल कोळी, दिनेश कोळी, रवींद्र कोळी, भरत भाऊसाहेब, रवींद्र महाजन, प्रताप कोळी, स्वयंपाकी कल्पना कोळी, प्रमिला कोळी, अंगणवाडी सेविका हिराबाई कोळी, मदतनीस योगिता कोळी, सुनीता पाटील, मुख्याध्यापक हेमंत भामरे, उपमुख्याध्यापक विकास पाटील, मनीषा पाटील यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन हेमंत पाटील तर प्रवीण पाटील यांनी आभार मानले.